# महिला सक्षमीकरणाची कोल्हापुरी मशाल : योगिता कोडोलीकर

## महिलांना आत्मनिर्भर करणारे 'प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाऊंडेशन'

कोल्हापूरच्या मातीत अनेक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे जन्माला आली आहेत. स्वतःपलीकडे जाऊन, समाजाचा विचार करण्याची वृत्ती, हाच ज्यांचा स्थायीभाव आहे, असे एक नाव म्हणजे योगिता प्रवीण कोडोलीकर. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या योगिताजी 'प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाऊंडेशन'द्वारे महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत.

### कौटुंबिक वारसा

योगिताजींचा प्रवास ग्रामीण भागातून सुरु झाला. डी. सी. नरके महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य वाय. सी. कांबळे आणि वत्सला कांबळे (कुडित्रे) यांच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण डी. सी. नरके हायस्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण करून त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एम.एस्सी. (संगणकशास्त्र) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर त्या सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्याशी विवाहबद्ध होऊन शहरात आल्या. पती डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्याकडून सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन, महिलांसाठी काहीतरी भरीव कार्य करण्याची भावना योगिता यांच्या मनात रुजली आणि त्यातूनच 'प्रयोदी' संस्थेची संकल्पना साकार झाली. ग्रामीण तसेच शहरी भागातील संघर्षरत महिलांना त्यांनी मदतीचा हात दिला, ज्यामुळे त्यांची ग्रामीण भागाशी असलेली नाळ कधीच तुटली नाही.

महिला सक्षमीकरणाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी २०१८ मध्ये योगिता यांनी 'प्रयोदी'ची स्थापना केली. फाऊंडेशनचे मुख्य उद्दिष्ट गृहिणी, नोकरदार, व्यावसायिक आणि लघुउद्योजक महिलांना एका व्यासपीठावर आणणे हे होते. या व्यासपीठावर त्यांच्या अनुभवांची देवाण-घेवाण होईल, एकमेकींना प्रेरणा मिळेल आणि व्यवसायाच्या नवनवीन संधी निर्माण होतील असे वातावरण योगिताजींनी निर्माण केले.

### समाजकार्याचे आयाम

कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या काळात जेव्हा माणूस माणसापासून दूर जात होता, तेव्हा योगिता आणि त्यांच्या 'प्रयोदी' संस्थेने समाजाप्रति आपले कर्तव्य बजावले. कितीतरी गरजू कुटुंबांना महिलांनी बनविलेले खाद्यपदार्थ आणि जेवणाचे डबे पुरवून मदतीचा हात दिला. यामुळे अनेक महिलांना रोजगार मिळाला. कोरोना काळात अनेकांचा रोजगार बुडाला असताना, 'प्रयोदी सोशल फाऊंडेशन'ने ८४५ कुटुंबांना दोन महिने पुरेल इतके जीवनावश्यक साहित्य, मदतस्वरूपात पुरविले. महापुराच्या काळातही त्यांनी पूरग्रस्त महिलांना साड्या वाटप आणि इतर साहित्य वाटपात पुढाकार घेतला. त्यांनी स्व-मालकीची बोअरवेल पाण्यासाठी उपलब्ध करून दिली. दऱ्याचे वडगाव येथील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी असलेल्या शाळेला पुस्तके देऊन त्यांनी शैक्षणिक मदतीचा हातही दिला. 'प्रयोदी'च्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या अनेक शासकीय योजनांची माहिती देणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि कायदेशीर बाबी समजावून सांगणे, हे कार्य अविरत सुरू आहे.



योगिता कोडोलीकर
संस्थापक-अध्यक्ष,
प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाऊंडेशन, कोल्हापूर

महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत श्वास अ‍ॅकॅडमी आणि 'प्रयोदी फाऊंडेशन'तर्फे एरोबिक्स, झुंबा आणि योगासने कार्यशाळेचे आयोजन केले जाते. लवकरच महिला आणि युवतींसाठी समुपदेशन केंद्र उभारण्याची त्यांची योजना आहे.



महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम आणि बचत गटांची स्थापना करण्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे. याव्यतिरिक्त, महिलांच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून येथील महिला व मुलांचे प्रश्न सोडविण्यात त्यांचा नेहमी पुढाकार असतो. महिला सक्षणीकरणाला प्राधान्य देत असतानाच योगितताई समाजातील तरुणाईप्रतिही तितक्याच संवेदनशील आहेत. 'प्रयोदी'च्या माध्यमातून तरुणाईसाठी अनेक उपक्रम त्या राबवितात. पारंपरिक हळदी-कुंकूसारख्या कार्यक्रमांमध्ये विधवा महिलांना निमंत्रित करून त्यांनी सामाजिक समरसतेचा संदेश दिला आहे. युवतींसाठी करिअर मार्गदर्शन आणि स्वसंरक्षण कार्यशाळा घेऊन त्या तरुण पिढीला सक्षम बनवीत आहेत. कायम खाकी युनिफॉर्ममध्ये असणाऱ्या महिला पोलिसांना थोडासा कामात विरंगुळा मिळावा, यासाठी त्या दर संक्रातीला त्या महिला पोलिसांसोबत हळदी-कुंकू कार्यक्रम घेऊन समाजात एक वेगळे उदाहरण आणि संदेश देतात.

### राजकारणात येण्याचा मानस

महिलांच्या हितासाठी आणि समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावीपणे काम करता यावे, यासाठी योगिता यांनी राजकारणात उतरण्याचा निर्धार केला आहे. राजकीय क्षेत्रातील संधीचा उपयोग त्या विचारेमाळ परिसराच्या विकासासाठी आणि महिलांच्या प्रगतीसाठी करणार असल्याचे त्या सांगतात. स्थानिक राजकारणात सक्रिय होऊन त्या महिलांचे प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे मांडून त्यांना आवश्यक त्या सुविधा मिळवून देऊ शकतील, असा त्यांना विश्वास आहे. या परिसरात हातावरचे पोट असलेली बहुतांश कुटुंबे राहतात. जगण्याशी लढाई सुरू असलेल्या कुटुंबांना सर्व सुखसोयी मिळाव्यात, यासाठी योगिता यांचा नेहमीच प्रयत्न असतो. त्यांच्या आजवरच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यामध्ये मुक्ता फाऊंडेशनतर्फे महिला सन्मान पुरस्कार २०२३, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, हिल रायडर्स अ‍ॅडव्हेंचर फाऊंडेशन आणि कृष्णा फाऊंडेशनतर्फे मिळालेला कर्तृत्ववान महिला सन्मान यांचा समावेश आहे. नंदादीप प्रतिष्ठान, पुणे व प्रयोदी फाऊंडेशनच्या माध्यमातून कोल्हापुरातील महिलांना टू व्हीलर व फोर व्हीलर चालविण्याचे प्रशिक्षण मोफत देण्याचा त्यांचा मानस आहे.